# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/04/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## सदोष मनुष्यवध

**पोस्टे बेला:–** अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा सोनेगाव फाटा येथे दिनांक १५/०४/२०२३ चे २१.१५ वा. ते २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– जान्या उर्फे ज्ञानेश्वर महेन्द्र खोब्रागडे, वय २२ वर्ष रा. ईतवारी पोलीस चौकी जवळ जि. वर्धा हे आपले घरी हजर असता त्याचा चुलत भाऊ नामे –किसन शंकर खोब्रागडे याने कोंढाळी येथील विनायक बांगरे कडे असलेले १,३०,०००/– रु. आणणे करिता चाल व सोबत मित्रांना सुद्धा घे. ऑटो भाड्याने केलेला आहे व खर्चा पाण्यासाठी ३०,०००/– रु. देतील. अशा सांगितलेवरुन त्याचे घराजवळ राहणारा निखील अरुण नारनवरे, चुलत भाऊ नामे– किसन शंकर खोब्रागडे, मामा नरेश बावने तसेच काका व ऑटोवाला असे मिळून कोंढाळीला निघाले व दि १५.०४.२०२३ रोजी २०.४५ वा. कोंढाळी येथे पोहचले असता मामा नामे–नरेश बावने हा पैसे मागणे करीता विनायक बांगरे याचे घरी एकटाच गेला व बाकी सर्व ऑटो जवळ थांबले. काही वेळाने जोरजोराचा आवाज आल्याने निखील अरुन नारनवरे, चुलत भाऊ नामे किसन शंकर खोब्रागडे विनायक बांगरे याचे घराजवळ गेले असता त्याच्याशी भांडण केले असता फिर्यादीने ऑटो काढण्यास सांगितले वरुन ऑटोत फिर्यादी व निखील अरुण नारनवरे, ऑटो चालकसह नागपुरच्या दिशेने निघुन गेले व चुलत भाऊ नामे – किसन शंकर खोब्रागडे, मामा नरेश बावणे तसेच काका यांना कोंढाळीतच सोडून दिले. सोनेगाव येथे अंदाजे २१.१५ वा दरम्यान पोहचले असता विनायक बांगरे याचा मुलगा **आरोपी नामे–१) अमोल विनायक बांगरे वय २९ वर्ष रा. कानकाठी ता. समुद्रपूर जि. वर्धा** व त्याचे तिन साथीदार **२) गितेश सुभाष निन्देकर वय २६ वर्ष रा. रामनगर पोस्ट वायगाव ता. समुद्रपूर जि. वर्धा ३) मनोज सुभाष सलाम वय २६ वर्ष रा. कांढरी ता. समुद्रपुर जि. वर्धा ४) अतिश दादारावजी चौधरी वय २८ वर्ष रा. कानकाठी ता. समुद्रपुर जि. वर्धा** यांनी मोटार सायकलनी पाठलाग करुन ऑटोवर काठीने मारत होते व दगड फेक केली. त्यातील एक दगड निखील अरुन नारनवरे, वय २० वर्षे, रा. ईतवारा बाजार पोलीस चौकी जवळ जि. वर्धा यास लागला असता तो चालत्या ऑटो मधुन खाली पडुन मरण पावला व फिर्यादीचे डावे पायाला सुद्धा दगड लागल्याने जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३०४, ३३६, ३३७, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि अजित कदम, पो.स्टे. बेला मो. ९१११२९८५९२२ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा जलालखेडा बसस्टॉप येथे दिनांक १६/०४/२०२३ चे १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राहुल मारोतराव ठाकरे, वय ३० वर्ष, रा. नायगाव ठाकरे ता. नरखेड हा काही कामानिमित्य जलालखेडा येथे आला असता यातील **आरोपी नामे— सचिन प्रेमनारायण चौधरी रा जलालखेडा वय अंदाजे ३८ वर्ष** याने त्याचे दुकानासमोर फिर्यादीला बोलावुन शेतीच्या व धुऱ्याच्या जुन्या वादावरून फिर्यादीसोबत वादविवाद करून पेपरवेट हातात पकडुन फिर्यादीच्या डोक्याच्या डाव्या बाजुने कानाच्या वर पेपरवेट मारल्याने फिर्यादीचे डोके फुटुन रक्त निघाले व शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पुरूषोत्तम धोंडे ब. नं. ३२२ मो. क्र. ८७८८३६५२१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील वार्ड नं २ खापरखेडा येथे दिनांक १५/०४/२०२३ चे २२/३० वा. ते २३/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— साहील उमेश खेडकर वय १७ वर्ष, रा. वार्ड नं २ खापरखेडा यांचा मुलगा व आरोपी नामे— उमेश कृष्णाजी खेडकर वय ४० रा. वार्ड क्रं. २ खापरखेडा हे वडील असून वडील हे दारू पिण्याचे सवयीचे आहेत व शिल्लक कारणावरून नेहमी घरी झगडा भांडण करतात. नमूद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा घरी टी. व्ही. पाहत असता आरोपी वडील हे बाहेरून दारू पिऊन आले असता फिर्यादीने टीव्हीचा मोबाईल कुठे आहे. असे विचारले तर आरोपीने फिर्यादीच्या आईला झोपेतून उठवले व शिवीगाळ करू लागले यावर फिर्यादीने हटकले असता आरोपीने फिर्यादीच्या डोक्याला लोखंडी बाल्टीने मारून जखमी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जाधव सा पोस्टे खापरखेडा मो.न.९९२३१०४३१० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. वेलतूर** :— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा किन्ही येथे दिनांक १५/०४/२०२३ चे १९/०० वा. ते १५/०४/२०२३ चे १९/२० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— १) राम दयाराम चवडे, वय ३३ वर्ष, २) लक्ष्मण दयाराम चवडे वय ३३ दोन्ही रा. किन्ही ता. कुही. जि. नागपूर** हे किराणा दुकानावर गेले असता त्या ठिकाणी फिर्यादी नामे— विजय मधुकर ठवकर, वय ४१ वर्ष, रा. किन्ही ता. कूही याला पाहुन आरोपीने शिवीगाळी केली या वरून फिर्यादीने आरोपीस हटकले असता यातील आरोपीने फिर्यादीस हातबुक्क्याने मारहान केली व बाजुला असलेल्या काठीने डोक्यावर मारून जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. चंद्रकांत रेवतकर, पो.स्टे. वेलतूर ता. कूही मो.नं. ८८८८९०२३०२ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा मांद्री येथे दिनांक १४/०४/२०२३ चे २२/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— रोशन दिगांबर मडकवार, वय ३४ वर्ष, रा. मांद्री ता. रामटेक याचा आतेभाऊ नामे— गौरव मोटघरे व **आरोपी क्र. ३) दिक्षीत सुर्यभान मेश्राम तिन्ही रा. मांद्री ता. रामटेक** यांचे मध्ये होळीच्या सणा मध्ये नाचण्याचे कारणावरून झगडा भांडण झाले होते तेव्हा फिर्यादीने मध्यस्थी जावुन त्यांचे भांडण सोडविले होते. त्यामुळे आरोपी क्र. ३ याचे मनात फिर्यादी बददल राग होता. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती निमीत्य मोहल्ल्यातील बौध्द विहारात जेवण करणे करीता गेला तेव्हा तेथे फिर्यादी कडुन पाण्याचा ग्लास खाली पडल्याने आरोपी क्र. ३ हा फिर्यादी कडे पाहत असल्याने फिर्यादीने त्यास म्हटले कि तु माझे कडे काय पाहतो असे म्हटले असता आरोपी क्र. ३ हा घरी गेला व आरोपी क्र. १) सुर्यभान कारू मेश्राम व २) बाल्या कारू मेश्राम यांना बोलावुन आणले व आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीला ढकलढुकल करून मारहाण केले व आरोपी क्र. ३ याने त्याचे हातातील काठी फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना उमेश गाढवे ब.न. ९६९ मो. नं. ९८२२६१०८०२ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील नगर भवन जवळ काटोल येथे दिनांक ०४/०४/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक १५/०४/२०२३ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मधुकी सुर्यभान बागडे वय ५९ वर्ष रा. पंचवटी काटोल ह.मु बारोकार बिल्डींन नगर भवन जवळ काटोल हा आपले खोलीचा दरवाजा बंद न करता दरवाजा उघडाच सोडुन झोपुन गेला व सकाळी ०७/०० वा. झोपेतुन उठला असता फिर्यादीने बॅगेत ठेवलेले त्याचे व पुतण्याचे जुने वापरते तीन ड्रेस व नगदी ६०००/— रूपये कोणीतरी अज्ञात चोराने खोलीचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेवुन चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी चव्हाण पोस्टे काटोल हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**